**Prabhat, Pune (Marathi) 4 July 13**

# पवन ऊर्जेमुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम

**दिल्लीतील सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंटच्या अहवालातील निष्कर्ष**

पुणे, दि. ३ (प्रतिनिधी) - पवन ऊर्जेमुळे पर्यावरणावर मोठ्या प्रमाणात परिणाम होतो, असा निष्कर्ष दिल्ली येथील सेंटर फॉर सायन्स अॅन्ड एन्व्हायर्नमेंट या संस्थेने प्रकाशित केलेल्या अहवालात मांडला आहे.

दिल्ली येथील सेंटर फॉर सायन्स अॅन्ड एन्व्हायर्नमेंट या संस्थेने यशदा येथे 'पवन ऊर्जेसाठी हरित नियम' या एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. या चर्चासत्रात हा अहवाल प्रकाशित करण्यात आला. सेंटर फॉर सायन्स अॅन्ड एन्व्हायर्नमेंटचे उपसंचालक चंद्र भूषण, सुझलॉन एनर्जीचे चिंतन शहा, क्रिएटिव्ह नेचर फ्रेंड्सचे नाना खामकर आदींसह विविध पर्यावरणतज्ज्ञ या चर्चासत्रात सहभागी झाले होते. भारत हा पवन ऊर्जेच्या वापराबाबत आघाडीवर आहे. मात्र, याचे पर्यावरणावर होणारे विपरीत परिणाम रोखण्यासाठी भारतातच कमी हरित नियम आहेत. पवन ऊर्जेच्या शाश्वत वाढीसाठी भारताने कडक हरित नियमांची अंमलबजावणी करायला हवी,

(पान ३ वर)

## पवनचक्क्या या डोंगरावरील बुजगावणे

शेतातील पिकांचे पक्ष्यांपासून संरक्षण व्हावे, यासाठी शेतकरी शेतात बुजगावणे उभारतात. पक्षी बुजगावण्यांना घाबरून शेतात येत नाहीत. डोंगरांवर पवन ऊर्जेसाठी उभारलेल्या मोठ्या पवनचक्क्यांना पक्षी घाबरतात. पक्षी पवनचक्क्यांपासून दूर जातात. त्यामुळे पवनचक्क्या या डोंगरावर उभारलेले बुजगावणे आहेत, असे क्रिएटिव्ह नेचर फ्रेंड्सचे नाना खामकर यांनी सांगितले.

पान १ वरून

## ...पर्यावरणावर विपरीत परिणाम

असे मत संशोधकांनी या चर्चासत्रात व्यक्त केले.

चंद्रभूषण म्हणाले, मागील सात वर्षांपासून पवन ऊर्जा प्रकल्पांसाठी वनजमिनींची मागणी उद्योजकांकडून सातत्याने वाढत असल्याचे सीएसईच्या अभ्यासात आढळले आहे. पर्यावरणीयदृष्ट्या अतिशय संवेदनशील असलेल्या उदाहरणार्थ अभयारण्यासारख्या क्षेत्राच्या जवळ पवनऊर्जेचे प्रकल्प उभारताना पर्यावरण अहवालाचा अभ्यास न करताच हे प्रकल्प उभारले आहेत.

सीएसईने केलेल्या अभ्यासात पवनऊर्जा प्रकल्पांना तात्विक मान्यता मिळण्यासाठी महिन्यापेक्षा कमी कालावधी लागलेला आहे. पवनऊर्जेसाठी वनविभागाची अंतिम मान्यता मिळण्यासाठी सर्वसाधारणपणे साडेसात महिने लागले. इतक्या कमी कालावधीत पर्यावरणाच्या संभाव्य परिणामांचा अभ्यास केवळ अशक्य आहे. त्यामुळे पवनऊर्जा प्रकल्पांचा जंगलातील जैविकतेवर काय परिणाम होतो, हे समजून न घेताच बहुतांश वनजमीन अशा प्रकल्पांसाठी हस्तांतरित करण्यात आल्या असल्याचे चंद्रभूषण यांनी सांगितले.

पवनऊर्जा प्रकल्पांच्या ठिकाणी पवनऊर्जा प्रकल्प आराखडा तयार करावा, नागरिकांवर होणाऱ्या संभाव्य आरोग्यविषयक परिणामांबाबत निकष निश्चित करावेत, या प्रकल्पांमधून तयार होणाऱ्या विजेवर तेथील लोकांचा पहिला अधिकार असावा आणि जमिनीच्या वापराबाबत निकष निश्चित करावेत, अशा शिफारसी सीएसईने या चर्चासत्रात सुचविल्या.